

# वाटा आणि वळणे...

लेखक :- महेंद्र कुलकर्णी

साहित्य प्रतिष्ठान

# वाटा आणि वळणे...

प्रथम आवृत्ती : १६ एप्रिल २०१२

संकल्प, संकल्पना, लेखन: **महेंद्र कुलकर्णी**

9820605381

मांडणी व सजावट : सोनाली घाटपांडे

प्रकाशन :

ई साहित्य प्रतिष्ठान

जी ११०२, इटर्निटी

ठाणे, ४००६०४

www.esahity.com

© 2012महेंद्र कुलकर्णी.

या पुस्तकातील लेखन व चित्रे यांचे सर्व हक्क महेंद्र कुलकर्णी यांचेकडे असून यातील कोणताही भाग कोणत्याही स्वरूपात प्रकाशित करण्यापुर्वी त्यांची परवानगी घेणे आवश्यक आहे.

संपर्क :

esahity@gmail.com

९८६९६७४८२०

अधिक माहितीसाठी या लिंक्सना भेट द्या -

www.facebook.com/esahity  Marathi kavita  Kavyanjali  http://kayvatelte.com/

www.esahity.com

## लेखकाचे शब्द



स्वतःबद्दल काही लिहायचं म्हटलं की खरंच थोडं कठीण वाटतं, तरी पण हा एक लहानसा प्रयत्न.

माझं नाव महेंद्र कुलकर्णी. गेले तीन वर्ष "काय वाटेल ते" या ब्लॉगवर (http://kayvatelte.com) अगदी कुठल्याही विषयावर लिहीत असतो . आपल्या आजूबाजूला घडणा -या घटनांवर आपलं प्रत्येकाचंच काही तरी मत असतं. मग ते राजकारण, घरातली एखादी घटना , किंवा एखादा नवीन सिनेमा असो. पण आपलं मत ऐकुन घ्यायला कोणी तयारच नसतं! केवळ हेच एक कारण की केवळ आपली मतं मांडायला एक व्यासपीठ असावं म्हणून आपल्या ब्लॉग वर लिहीणं सुरु केलं.

सुरुवातीला राजकाणावर पण लिहीत होतो . पण हल्ली राजकारण हा विषय इतका उगाळून झालेला असतो की त्यावर लिहीण्याची इच्छाच होत नाही . गेल्या तीन वर्षात निरनिराळ्या विषयांवर जवळपास ६०० च्या वर लेख माझ्या ब्लॉग वर लिहीलेले आहेत, ज्या मधे कथा, ललित, प्रवास वर्णनं, खाद्ययात्रा आणि अवांतर वगैरे विषय आहेत.

व्यवसायाने मी मेकॅनिकल इंजिनिअर , आणि नोकरी मार्केटींग मधे. त्यामुळे कामा निमित्त प्रवास खूप घडतो .

काही लोकांचं असतं की एखाद्या भागात फिरायला गेल्यावर तिथल्या जेवणाला नांवं ठेवायची आणि आपला स्वतःचा मुड खराब करून घ्यायचा . माझा एक भोपाळचा मित्र जेंव्हा गुजराथला आला होता, तेंव्हा त्याची कम्प्लेंट म्हणजे प्रत्येक भाजी मधे घातला जाणारा गुळ , आणि जितके दिवस तो अहमदाबादला होता तितके दिवस दररोज जेवायला बसतांना चिडचिड करायचा. पण माझं तसं नाही, गुजरातला गेल्यावर ज्या चवीने तिथल्या गोड भाज्या , आणि गोड कढी आवडीने खातो, त्याच आवडीने नागपूरला गेल्यावर काशीनाथ सावजी चा चिकन रस्सा, किंवा गोव्याला गेल्यावर फिशकरी राईस खातो.

एकदा घराबाहेर पडल्यावर खाण्याच्या तक्रारी करणं सोडलं की मग कुठलाही प्रवास हा सुसह्य होतो . आणि माझी खाण्याच्या बाबतीत काहीच कम्प्लेंट नसल्याने, महिन्यातले १५ दिवस कामानिमित्त प्रवास करावा लागला तरीही माझी काही तक्रार नसते.

प्रवास करतांना बरेचदा अनपेक्षित पणे काही गोष्टी समोर येतात. जसे एकदा सम्बलपूर हून रायपूरला परत येतांना रस्त्यावर एके ठिकाणी उत्खनन सुरु असलेले दिसले . क्युरिओसिटी मुळे तिथे थांबलो आणि नशिबाने तिथे जगविख्यात असलेले उत्खनन शास्त्रा वर ज्यांची किमान डझनभर तरी पुस्तकं रेफरन्स बुक म्हणून वापरली जातात असे अरूण कुमार शर्मा वय अंदाजे ७५ च्या वर भेटले . त्यांची भेट झाली , आणि त्यांनी जून्या वास्तू कशा पहायच्या, त्या मधे काय पहायचं याचे मुलभूत धडे दिले , आणि त्या नंतर प्रवास करतांना एक वेगळी दृष्टी ठेऊन प्रवास करण्याची सवय लागली.

सामान्य पणे प्रवास वर्णनं लिहितांना केंव्हा निघालो , कुठे थांबलो, काय खाणं झालं , आणि शेवटी थोडक्यात काय

पाहिलं अशा पठडीतली प्रवास वर्णनं लिहिणे मला कधीच जमले नाही -तर "प्रत्येक प्रवास - माझ्या नजरेतून" अशा प्रकारचे काहीसे लिखाण माझ्या ब्लॉग वर आढळेल . प्रवास वर्णनात बरेचदा साईट सिईंग शिवाय पण ब -याच काही गोष्टी आलेल्या असतात- जसे खीर भवानी ही काश्मीर मधली भटकंतीची पोस्ट वगैरे किंवा गुजराथ मधली पटोला साडी वरची पोस्ट . प्रवासाला गेलो , आणि एखादी गोष्ट पाहिली म्हणून त्या वर लिहीले असे मी कधीच करत नाही . जी गोष्ट पाहिली तिला जर एखादा वेगळा पैलू असेल तरच त्यावर लिहीण्याचा प्रयत्न करतो मी.

प्रवास करतांना फक्त मोबाइल फोनचा कॅमेरा वापरण्याची माझी सवय आहे . बरेचदा स्पेशली जेंव्हा एखादं मस्त पैकी कोरीव काम असलेलं मंदीर पहातो , किंवा दूरवर उडणारा पांढरा स्वच्छ बगळ्यांचा थवा पहातो , तेंव्हा असं वाटतं की आपणही एखादा एसएलआर घ्यावा , पण राहून जातं. तसंही एक मोबाईल सांभाळणंच तर कठीण असतं , अजून एक लायब्लिटी कशाला हा विचार तर नक्कीच असतो मनात . नुकताच माझा लॅपटॉप हरवल्याने माझ्या वेंधळे पणाव र पूर्णपणे शिक्कामोर्तब झालेले आहे . असो.

हे ई बुक ब-याच दिवसांपासून पब्लिश करण्याचे चालले होते, पण काही ना काही कारणाने राहून जात होते.
सुनील सामंत, सोनाली घाटपांडे आणि प्रथमेश यांनी या साठी बराच वेळ दिला आणि हे पुस्तक तुम्हा सगळ्यांपर्यंत पोहोचवले त्यासाठी त्यांचे आभार .
या व्यतरिक्त अजून काही लेख वाचायचे असतील तर ब्लॉगला जरूर भेट द्या.

**महेंद्र कुलकर्णी (9820605381)**

# अनुक्रमणिका

चापानेरचे वर्ल्ड हेरीटेज ६
सांचीचा स्तूप १४
फोर्ट अग्वादा- गोवा १८
आठवं आश्चर्य.. स्टेप वेल.. २२
द्वारका - ओखा पोर्ट २८
फोर्ट ग्वालियर ३३
उत्खननाच्या साईट्वर - १ ३४
उत्खननाच्या साईट्वर - २ ४०
खीर भवानी. ५४
रानीकी वाव - वर्ल्ड हेरीटेज ५९
सूर्य मंदीर - मोढेरा ६३

# चापानेरचे वर्ल्ड हेरीटेज

खरं तर जेंव्हा त्या रस्त्याने गेलो, तेंव्हा आपण इथे थांबु असे कधीच वाटले नव्हते.  सकाळची १० ची वेळ होती. कोवळी उन्हं त्या तटबंदीच्या दगडावर पडून सोन्यासारखी झळाळी आणत होती त्या तटबंदीला. इतकं सुंदर दृष्य क्वचितच दिसतं, त्या सोनेरी रंगावर नजर ठरत नव्हती. मधेच एक सज्जा पण दिसत होता. तटबंदीला सज्जा?? पहिल्यांदाच पाहिला होता.



दुरुन दिसणारी भिंत आणि सज्जा



विटांचे बुरुज.. सगळी भिंत दगडाची मग हे बुरुज विटांचे का.

चापानेर!! बडोद्या पासून फक्त ५० किमी वर असलेली ही जागा. तसं म्हटलं तर ही जागा प्रसिद्ध  आहे ती पावागढ वासीनी देवी साठी. लोकं चापानेरला येतात, आणि इथून सरळ गडावर निघून जातात देवीच्या दर्शनासाठी. इथे ही तटबंदी असलेला भाग पहायला कुणीच येत नाही. माझ्या बरोबर असलेला मित्र पण म्हणाला की आधी इथे दहादा तरी येऊन गेलो असेन, पण फक्त देवीचे दर्शन घेऊन परत गेलो, इथे काय आहे ते पहायला आलो नाही. पण मला मात्र समोरच्या  तटबंदीचा  मोठा दिंडी दरवाजा  सारखा खुणावत होता- काहीतरी वेगळं पहायला मिळेल आत असे सारखे वाटत होते. शेवटी  रहावलं नाही, आणि ड्रायव्हरला गाडी साईडला घ्यायला सांगितली.

उतरून आत त्या दरवाजाकडे निघालो. बाहेरून पाहिल्यावर ही भिंत म्हणजे शहराची तटबंदी असल्यासारखी दिसत होती. त्या तटबंदीला पण सरकारी खर्चाने कुंपण घातलेलं दिसत होतं. मुळ बांधकाम काही ठिकाणी दगडी , तर काही ठिकाणी विटांचे बांधकाम दिसत होते. बुरुज विटांचा बघून तर मला आश्चर्यच वाटले. बुरूज तर दगडी असायला हवे ना?





मुख्य प्रवेशद्वाराच्या शेजारची जागा. अजून किल्ल्यात जायचं आहे, पण समोरच आधी मुतारी दिसते. खरं तर हा फोटो वर लावायला हवा होता, आणि नंतर वरचा मुख्य दाराचा.

कार पार्क करुन त्या दिंडी दरवाजा कडे निघालो. जसा जसा जवळ जात गेलो, तसा तसा मिथेनचा उग्र वास नाकात शिरत होता. किळस वाटली  आणि रागही आला, इतक्या चांगल्या जुन्या धरोहरचा मुतारी म्हणून केल्या जाणारा उपयोग पाहिल्यावर! आत काय आहे याची काहीच कल्पना नव्हती सरळ आत चालत गेलो. मुख्य दरवाजाच्या वर एक सज्जा दिसला. बहुतेक पूर्वीच्या काळी इथे वाजंत्री , म्हणजे चौघडा वाजवण्यासाठी लोकं बसत असावेत का? की  बाहेर नजर ठेवण्यासाठी आहे तो??



थोडं आत गेलं की तिसरं दार लागतं. गावातल्या लोकांचा वहिवाटीचा रस्ता आहे हा.




शहर मस्जिद पुर्ण व्ह्यु.पाच घुमट आणि बरेच खांब असलेले हे स्ट्रक्चर आहे .

थोडं आत चालत गेल्यावर आपल्या गेलेल्या वैभवाच्या खुणा अंगावर बाळगत दगडी भिंत साथ देत होती. समोरच्या दरवाजाच्या शेजारी एक फुलं कोरलेले दिसत होते. थोडे पुढे गेल्यावर डाव्या हाताला एक चांगल्या स्थिती मधे असलेली एक पाच घुमट असलेली इमारत आणि तिचे दोन मिनार लक्ष वेधून घेत होते. टूरीझम डिपार्टमेंटचे तिकिटांचे काउंटर पण गेट वर दिसले.   आत गेल्यावर एक मॉडरेटली कलाकुसर केलेली इमारत समोर दिसत होती. एका दगडावर लिहले होते  , की ही इमारत १५२२ साली बांधण्यात आली .म्हणजे ५३३ वर्षापूर्वी- मनातल्या मनात गणित केले.



भिंत, बाहेरुन दगडाची आणि आत मात्र विटा , चुना बांधकाम असलेली.



जामा मस्जिद मिनाराचे कार्व्हिंग

कला कुसर जरी फारशी केलेली नसली, तरी इमारत खूप छान दिसत होती. इतकी वर्ष झाली तरीही अजुन ही इमारत चांगल्या अवस्थेत आहे. कदाचित फार जास्त लोकं येत नसेल म्हणून असेल. आत शिरल्यावर एखाद्या हिंदू मंदिराच्या प्रमाणे खूप खांब असलेले सभामंडप दिसले . प्रार्थना करण्यासाठी कोनाडे केलेले आहेत बऱ्याच ठिकाणी. मस्जिद मधे पण एक प्रकारचा घाण वास सुटला होता. इथे पण कोणीतरी कोप-यामधे मुत्रविसर्जन केलेले दिसत होते. इतकी जुनी आणि सुंदर वास्तू, जी पुरातत्त्व विभागाच्या अखत्यारीत आहे अशी- आणि ही अवस्था?? पुरातत्त्व विभाग बरोबर आपलंही काही कर्तव्य आहे हे मी विसरलोच होतो.

मस्जिदच्या आवारातच एक दगडी भिंत तुटलेली दिसत होती. ती पाहिल्यावर लक्षात आलं, की बाहेरची तटबंदी काही ठिकाणी विटांची, आणि काही ठिकाणी दगडी का आहे ते. बाहेरुन दगडी बांधकाम, पण आतमधे मात्र चांगली ५ फुटाची विटांची भिंत आणि त्याला आतून पण दगडाने मढवलेले.. असा तो प्रकार दिसत होता. मस्जिद एका ओट्यावर बांधलेली आहे. ५०० वर्ष जुनी वास्तू ,म्हणून खूप महत्त्वाची वास्तू आहे ही.



आत मधे फिरून आल्यावर बाहेर निघालो, तर बाहेर गेटवर पुरातत्त्व विभागाच्या तिकीट घरात विचारले की इथे राजवाडा कुठे आहे? तसं काही शिल्लक नाही म्हणे इथे! पण हो, एक जामा मस्जिद म्हणून मस्जिद आहे म्हणे. साधारण एक किमी अंतरावर. उन्हं तर तापलं होतं, पण दहा मिनीटे चालल्यावर पुन्हा शहराची तटबंदी लागली. आता मोडकळीस आलेली, आजूबाजूला असलेले जुन्या घरांचे जोते, अर्धवट पडलेल्या भिंती॰ एक वेगळीच वातावरण निर्मिती करत होत्या. कोणीही समोर नव्ह्तं. मला क्लिंट इस्ट्वुड चा जुना सिनेमा आठवला. रखरखीत टळटळीत दुपार झाल्यासारखं उन्हं सकाळच्या ११ वाजताच होतं.

मस्जिद समोर पोहोचलो. दुरून तर फक्त एक खूप मोठी असलेली मस्जिद असं वाटत होतं. चार मिनार, भरपूर घुमट , असलेली एक मोठी इमारत दिसत होती समोर.उंचवट्यावर बांधलेली सोनेरी दगडांची इमारत , बाहेरच्या बाजूला उघडणाऱ्या खिडक्या § की त्याला सज्जे म्हणायचं? कोरीव काम केलेले आहे त्यावर. वर चढून जाण्यासाठी पायऱ्या डाव्या आणि उजव्या बाजूला दिसत होत्या. इमारतीच्या आवारात शिरल्यावर वर्ल्ड हेरीटेज चे बोर्ड दिसले. म्हणजे अनपेक्षित पणे आपण एका महत्त्वाच्या जागी पोहोचलो तर!! स्वतःलाच शाबासकी दिली.




जामा मस्जिदचा मुख्य एंट्रन्स!



१५ फुट जाडीची भिंत ही शेवटची, आणि इथुन बाहेर पडलं की समोर दिसते ती जामा मस्जिद



मस्जिद खूप सुंदर आहे. बांधकाम पुर्ण होण्यास ८० वर्ष लागली असा कुठेतरी उल्लेख वाचला. पायऱ्या चढून आत शिरल्या बरोबर समोरच एक १५ बाय १५ चा व्हरंडा दिसतो. त्यातून डावीकडे पाहिले तर मस्जिदचे दार , आणि इतर ३ दिशांना बगीचे दिसत होते. कोरीव काम केलेल्या बऱ्याच जाळ्या मात्र आता तुटल्या आहेत , पण जितक्या शिल्लक आहेत तितक्या पाहिल्यावर इतर वस्तूची कल्पना येते.
आत शिरल्या बरोबर दोन्ही बाजूला पडलेल्या खोल्या दिसतात. नेहेमी प्रमाणे समोर एक मोठे आंगण आहे. तिथे साधारण लोकं नमाज पढण्यासाठी यायचे. इथे पण गाईड नाहीच, त्यामुळे कोणीच काही सांगायला नव्हते. पुन्हा तिकीट काउंटरवरच्या बाईंच्या कडे गेलो , आणि त्यांच्याकडे चौकशी केली , तर त्या बाइने तिला माहीती असलेली माहिती सांगितली.



छत आणि वरचे तिन मजले



कोरीव काम मिनारावरचे



तुटलेले खोल्यांचे अवशेष.. मशिदीच्या अंगणात. याच अंगणात आम जनता नमाज पढायची

ही एक ३ मजले असलेली मस्जिद आहे. अशा प्रकारची मस्जिद ही भारतामधे एकुलती एक आहे म्हणून महत्वाची.खालच्या मजल्यावर राजा स्वतः नमाज पढायचा, दुसऱ्या मजल्यावर त्याच्या राण्या, आणि तिसऱ्या मजल्यावर इतर सरदारांच्या बायका नमाज पढायच्या. मला आतापर्यंत वाटायचं की मस्जिद मधे फक्त पुरुषंनाच नमाज पढण्याची परवानगी आहे , पण इथे समजलं की बोहरा समाजात स्त्रियांना पण परवानगी आहे मस्जिद मधे येण्याची.मस्जिदच्या आतल्या भागात १७५ खांब आहेत. थोडंफार मंदिराच्या सभा मंडपा प्रमाणे बांधकाम आहे या मस्जिदचे. बऱ्याच ठिकाणी कोरीव काम पण केलेले आहे. पाचशे वर्षापूर्वी इथे कोणी मुस्लिम राजा होता, त्याच्या काळातले हे बांधकाम अजूनही सुस्थितीत आहे. त्या राजाबद्दल काही फारशी माहिती मिळाली नाही.

इतकी महत्त्वाची वास्तू, वर्ल्ड हेरीटेज असलेली, पण पूर्णपणे दुर्लक्षित. १४८८ पर्यंत हा किल्ला हिंदू राजा चौहानच्या ताब्यात होता, पण नंतरच्या काळात मात्र मुस्लिम राजा मुहम्मद ने ह्या राज्याला जिंकले.नंतर बेगाडा सुलतानाने ही जामा मस्जिद बांधली. १७५ खांब असलेली ही देखणी वास्तू युनेस्कोच्या नजरेस पडल्यावर हीला वर्ल्ड हेरीटेजचा दर्जा देण्यात आला. उंचावर प्लिंथ असलेली एक तीस मिटर उंचीची वास्तू अतिशय देखणी आहे .एका गोष्टीचे वाईट वाटले, की आपल्याकडे काय चांगल्या गोष्टी आहेत ते पण आपल्याला इतर कोणीतरी सांगावे लागते? दुर्दैव!! दुसरं काय!!

# सांचीचा स्तूप

पाच रुपयांच्या नोटेवर एक चित्र नेहमी असायचं, ते पाहिलं की त्या बद्दल एक वेगळंच आकर्षण वाटायचं, ते चित्र होतं "सांची स्तूप". बौद्ध धर्मीयांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे असलेले हे ठिकाण आज वर्ल्ड हेरीटेजच्या नकाश्यावर अग्रस्थानी आहे. कित्येक वर्ष "सांची" ही जागा कुठेतरी बिहारात आहे असे वाटायचे मला.



कामानिमित्त भोपाळ हून विदीशा मार्गे बीनाला जायला निघालो. जातांना अल्पोपाहारासाठी म्हणून विदीशाला थांबलो. विदीशाला प्रसिद्ध असलेली कचोरी आणि जिलबीचा नाश्ता करून पुढे निघणार, तेवढ्यात एक प्रवासी गट समोरून आला, आणि नुकतेच पाहून आलेल्या स्तूपाच्या जवळ साधे पाणी पण मिळू शकले नाही म्हणून त्यातले लोक वैताग व्यक्त करीत होते. त्यांचं बोलणं ऐकून उत्सुकता चाळवली आणि ते कुठल्या स्तूपाबद्दल बोलताहेत आणि तो कुठे आहे याची चौकशी केली, तर समजलं की फक्त ९ किमी अंतरावर हे सांचीचे स्तूप आहे.जातांना थोडी वाकडी वाट करून स्तूप पाहून मग पुढे बीनाला जायचे ठरवले.

आम्ही जेव्हा त्या ठिकाणी पोहोचलो, तेव्हा तिथे मप्रचा कडक उन्हाळा सुरू होता. कारच्या वातानुकुलीत सौख्यामधून बाहेर आल्यावर उन्हाचे चटके बसत होते अंगाला.पायातल्या बुटांच्या तळव्याखाली पण उष्णता जाणवत होती. या स्तूपाशेजारी खूप सुंदर बाग केलेली आहे. आम्ही जवळपास कुठे गाईड वगैरे दिसतो का म्हणून चौकशी केली, पण अर्थात तिथे कोणीच नव्हते. फक्त काकडी विकणारा एक माणूस मात्र झाडाखाली बसला होता, तो म्हणाला कोणी व्हिआयपी येणार असेल तर काही साहेब लोकं येतात इथे.



तसं म्हटलं तर °सांचीचा° संबंध कधीच  गौतम बुद्धाशी आला नाही. सम्राट अशोकाने बौद्ध धर्म स्वीकारल्यावर त्याला एक जागा हवी होती की जी शहरापासून फार दूर पण असू नये आणि फार जवळ पण असू नये ़ जेणेकरून बौद्ध भिक्खूंना भिक्षा मागण्यासाठी फार दूर जावे लागू नये . याच उद्देशाने विदिशापासून साधारण ८-९ किमी वर असलेली ही सांचीच्या स्तूपाची जागा निवडण्यात आली होती
. या स्तूपाचे पौराणिक वास्तू संशोधनाच्या दृष्टीने म्हणून महत्त्व खूप जास्त आहे याचे पहिले कारण म्हणजे ह्या स्तूपाच्या निर्मितीचे काम सम्राट अशोकाने इ.स. पूर्व २७३ साली सुरु केले होते .  ख्रिस्त पूर्व काळात निर्मिलेल्या फार कमी वास्तू आज अस्तित्वात आहेत  , त्या पैकी ही एक! या दोन्ही कारणांमुळे या स्तूपाचे महत्त्व खूप वाढते.



स्तूपाचे काम जरी इ.स. पूर्व २७३ साली सुरू झाले असले, तरीही त्या नंतरच्या ५०० वर्षांच्या काळात मुख्य स्तूपाच्या आसपास अशा अनेक स्तूपाचे आणि मठांचे काम १२व्या शतकापर्यंत सुरू राहिले. या मठांमध्ये बौद्ध भिक्खू राहून अर्चना करीत, आणि भिक्षा मागण्यासाठी जवळपासच्या गावात जात असत . ही जागा इतकी अद्वितीय आहे, की त्या काळात ( म्हणजे इस पूर्व) जगात कुठेही अशा प्रकारचे

बांधकाम तयार झालेले नाही. इतके असून सुध्दा   ह्या  स्तूपाची जागा म्हणजे एक असेच दुर्लक्षित वर्ल्ड हेरीटेज ठिकाण आहे . भारतीय लोकं भोपाळला गेल्यावर सरळ पचमढीला निघून जातात, पण केवळ ६८ किमी वर असलेल्या ह्या जागेला कोणीच फारशी भेट देत नाहीत.

या स्तूपांनी बौद्ध धर्माचा सुवर्णकाळ पाहिलेला आहे. १८१८ पर्यंत ह्या स्तूपाचे अवशेष पुर्णपणे दुर्लक्षित होते, म्हणजे या स्तूपाचे अस्तित्व किंवा महत्त्व पण कोणालाच माहीत नव्हते. पण १८८१ मध्ये काही ब्रिटिश अधिकार्यांिच्या नजरेत हा स्तूप आल्यावर मात्र या जागेवर बरंच उत्खनन करण्यात आले , आणि बाहेर निघालेल्या या स्तूपाची दुरुस्ती पण करण्यात आली. हे दुरुस्तीचे काम १९१२ ते १९१५ या काळात झाले . स्तूप म्हणजे काय?? तर, गौतम बुद्धाच्या परीनिर्वाणाची खूण म्हणजे स्तूप असे म्हटले जाते.



मुख्य स्तूपाच्या समोर असलेले ते सुंदर कोरीव काम असलेले चारही  दिशांना असलेले द्वार पाहिले, आणि नकळतच मनातल्या मनात त्या कारागिरांना हात जोडले गेले. या कमानींवर  अतिशय सुंदर असे कोरीव काम केलेले आहे. त्या कोरीव कामामध्ये बौद्ध धर्माच्या काही प्रतीकांचा वापर  करण्यात आलेला आहे. पूर्व पश्चिम उत्तर दक्षिण अशी चार दारं (कमानी) आहेत, एका कमानीवर जातक कथा, तर दुसर्याक एका कमानीवर गौतम बुद्धाच्या चरित्रातले काही प्रसंग पण कोरून दाखवण्यात आलेले आहेत. त्यावरची सगळी चित्र काही वाचता आली नाहीत, आणि त्यामुळे गाईडची कमतरता प्रकर्षाने जाणवली.



इसवीसन पुर्वीचे इतके सुंदर कोरीव काम ्जगात कुठेच नसावे .

या स्तूपामधली सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे घुमटाचा आकार..घुमटाचा आकार बनवणे हे इंजिनीअरिंगच्या दृष्ट्या फार कठीण समजले जाते. पूर्वीच्या काळी केवळ दगड व्यवस्थितपणे चौरस आकारात कापून आणि माती वापरून एकत्र बसवून बनवलेला घुमटाचा आकार केला आहे तो शंभर टक्के अचूक आहे. त्यात तसूभरही चूक नाही! . ख्रिस्त पूर्व काळात , कुठलीही औजारं नसताना इतकी सुंदर कलाकृती कशी काय निर्माण केली गेली असावी ? हा प्रश्न राहून राहून मनात येत होत

या स्तूपाचा अक्ष पण पृथ्वीच्या अक्षाशी समांतर आहे. पूर्वीच्या काळी हे साध्य करायला काय केले असावे? हा प्रश्न मनात उठत होता. या मुख्य स्तूपाच्या शेजारीच अर्धवट तुटलेले वगैरे असे दुसर्याह स्तूपाचे नुतनीकरण केले गेले आहे, पण हा मुख्य स्तूप म्हणजे कलाकारीचा अप्रतिम नमुना समजला जातो .

स्तूपाच्या वरून एक प्रदक्षिणा घालण्याची सोय केलेली आहे, चारही दिशांना सातपुड्याच्या रांगा , आणि उन्हामुळे वैराण झालेली जमीन दिसत होती. समोर बनवलेली बाग मात्र अगदी व्यवस्थितपणे राखली असल्याने डोळ्याला आल्हाददायक वाटत होते. एक उत्कृष्ट आणि महत्त्वाची पौराणिक वास्तु म्हणून अवश्य भेट द्यायला हवी.

बौद्ध धर्मीयांच्या मते देखील गौतम बुद्धाशी संबंधित नसल्याने ह्या वास्तुला फारसे धार्मिक महत्त्व दिले जात नसावे, आणि म्हणूनच फारशी वर्दळ पण इथे नसते .तरीही एकदा आवर्जून भेट द्यावी असे हे एक ठिकाण आहे.

# फोर्ट अग्वादा- गोवा

गोवा म्हंटलं की समुद्र ,मासे, काजू (बाटलीतली आणि पाकिटाला 😃 ) आणि परदेशी पर्यटक, अंगात शर्ट न घालता भाड्याने घेतलेल्या बाइक वर फिरतानाचे आठवतात. आपल्याला त्यांच्या गोऱ्या रंगाचे कौतूक तर त्यांना कातडी टॅन करून घेण्याचे डोहाळे. फेअर ऍंड लव्हली ची जाहीरात पाहताना ह्या लोकांच्या मनात काय येत असेल ? हा विचार नकळतच मनात आला आणि एकदम हसू फुटलं . हे लोकं टॅनिंग साठी असे उघडे फिरतात , पण अशा उघड्या फिरण्यामुळे त्यांची त्वचा टॅन होण्याऐवजी अक्षरशः लाल ला रंगाची दिसायला लागते , आणि त्यांना पाहिलं की सोलून उलटा टांगलेल्या बोकड किंवा लाल तोंड्या माकडाची आठवण येते मला!
समुद्र हा तर गोव्याचा एक महत्वाचा अट्रॅक्शन फॅक्टर आहेच , पण सोबतच इतरही बऱ्याच जागा आहेत , ज्यांच्याकडे फारसं लक्ष जात नाही- फोर्ट अग्वदा° हा पण त्यातलाच एक. पोर्तुगीज लोकांनी १६व्या शतकात सिंकेरीम बिच ( ताज हॉटेल जवळ) जवळ बांधलेला हा एक किल्ला ( मी स्वतः पण हा किल्ला कित्येक वर्ष गोव्याला येत असलो तरीही पाहिला नव्हता म्हणून दुर्लक्षित म्हणतोय). अग्वादा हा एक पोर्तुगीज शब्द, याचा अर्थ म्हणजे पाणी भरण्याची जागा ( वॉटरींग प्लेस) . जहाजा मधे पाणी भरण्यासाठी इथे जवळपास २४ लाख गॅलन पाणी स्टोअर केले जात असे. १७ कॉलम वर उभी असलेली ही अंडरग्राउंड टॅंक पूर्वीच्या काळी खूप महत्त्वाची होती. पोर्तुगल हून येणाऱ्या जहाजांचा हा भारतातला पहिला स्टॉप असायचा , त्यांना पाणी पुरवठा करण्यासाठी हा किल्ला बांधला होता. किल्ल्यावरून पाहिले असता चारही बाजूला व्यवस्थित नजर ठेवता येते , त्यामुळे किनाऱ्यावर येणाऱ्या पोर्तुगीज जहाजांना पुर्ण संरक्षण पुरवता यायचे.

तांबड्या चिऱ्याने बांधलेला हा किल्ला अजूनही दिमाखात वारा पावसाशी टक्कर देत उभा आहे. चिरा म्हणजे एक प्रकारच्या अग्निजन्य खडकातून कापून काढलेला दगडाचा तुकडा. हे असे दगडाचे/खडकाचे तुकडे तसं म्हंटलं तर फारच कच्चे असतात , पण या मधे एक जांभा नावाने ओळखला जाणारा चिरा , जेंव्हा उन- पावसाला जसा एक्स्पोझ होतो तसा तो जास्त पक्का होत जातो . हा किल्ला पण जांभा चिऱ्यातून बनवलेला आहे.

लहानपणापासूनच चांदोमामा चांदोमामा , रुसलास का ? लिंबोणीच्या झाडामागे ४. कविता ऐकत मोठे होतो कवितेतला मामाचा वाडा चिरेबंदी हे ऐकत मोठं होत असतो आपण , पण हा चिरा म्हणजे काय ते मात्र कित्येक वर्ष माहीत नव्हते. या कच्च्या चिऱ्याचा किल्ला इतका कसा काय टिकला हा विचार मनात आल्याशिवाय रहात नाही. ४०० वर्षाच्या काळात ह्या किल्ल्यावर कधीच कोणाचा हल्ला वगैरे झालेला नाही. सलग शेकडो वर्ष हा किल्ला पोर्तुगीज अधिपत्याखाली होता. जेंव्हा पोर्तुगीज गेले , तेंव्हा १९६२ च्या सुमारास हा किल्ला आपल्या ताब्यात आला. किल्ल्याचे कच्चे बांधकाम

पाहिले की नकळतच आपण त्याची तुलना शिवाजी महाराजांच्या दगडी किल्ल्यांशी करतो. महाराजांनी बांधलेल्या किल्ल्यापुढे हा किल्ला एकदम तकलादू वाटतो- चार पाच तोफेचे गोळे डागले ,तर तटबंदी कोसळून पडेल पत्त्याच्या बंगल्या सारखी असे वाटते! याच किल्ल्याच्या भरवशावर गोव्याच्या किनाऱ्यावर येणाऱ्या जहाजावर नजर ठेवण्याचे काम पोर्तुगीज करत हो्ते.

तर अशा ह्या चिऱ्यांपासून बांधलेला हा फोर्ट अग्वादा मांडवी नदीच्या मुखावर आहे. इथून पुढे मांडवी नदी अरबी समुद्राला मिळते. या ठिकाणी खरं तर आधी एक लाईट हाऊस बांधले गेले, आणि नंतर मग पाण्याची टाकी बांधली गेली. लाईट हाऊस वरचा दिवा दर सात मिनिटांनी चालू बंद होऊन समुद्रातून येणाऱ्या जहाजांना किनाऱ्याची कल्पना द्यायचे, नंतर १८६४ साली ह्या दिव्याची फ्रिक्वेन्सी पण ३ मिनिटे करण्यात आली आणि शेवटी १९७६ साली ह्याचा वापर पुर्ण बंद करण्यात आला.

इथे पाण्याचा खूप मोठा साठा पण करून ठेवण्यासाठी एक मोठी टॅंक बांधलेली आहे-( पाणी इथल्या झऱ्यांचेच जमा केले जाते. )खरं तर ह्या किल्ल्याचा मूळ उद्देश हा पाण्याचा साठा करण्यासाठी आणि दारूगोळा साठा करण्यासाठीच केला जायचा. दारू गोळ्याची कोठारं वगैरे आता बरीचशी तुटलेली आहेत- पण अवशेष पहायला मिळतात. किल्ल्याची तटबंदी अजूनही अभेद्य आहे. या किल्ल्यावर एकही तोफ आढळली नाही , आणि ती का नाही हे पण काही लक्षात आले नाही. पाण्याच्या टाकीच्या निर्मिती साठी डोंगराला पोखरताना जो दगड निघाला, तोच या किल्ल्याच्या बांधकामासाठी वापरला गेला असावा असे वाटते.

एक महत्त्वाची साईट, पण टूरिस्ट अट्रॅक्शन म्हणाल, तर अजिबात नाही अशी म्हणजे ही साईट. मी जेंव्हा या ठिकाणी अर्धा तास होतो तेंव्हा इथे फक्त काही गोरे टुरीस्ट दिसले, आपले भारतीय टुरिस्ट्स फारच कमी प्रमाणात होते. या किल्ल्याच्या पायथ्यापासून कित्येकदा जाणे झाले होते, पण इथे वर चढून कधी पहायला गेलो नव्हतो. ड्रायव्हर म्हणाला, अगर देखना है तो २०-२५ मिनिट बहूत है.. म्हणून तिथे थांबलो आणि नुकतेच जेवण झाले असल्याने थोडा पाय मोकळे केल्यासारखे होईल म्हणून किल्ल्यावर जायचे ठरवले. अगदी किल्ल्याच्या जवळ पर्यंत कार नेली जाऊ शकते- आणि अजिबात चढण वगैरे नसल्याने फार तर ५ मिनिटात तुम्ही तटबंदी जवळ पोहोचता.

किल्ल्याच्या सभोवताली असलेला खंदक जो आता रिकामा आहे तो ओलांडून आत पोहोचल्यावर एक विस्तीर्ण पठार , मध्यभागी टाकीचा भाग, आणि चारही बाजूला तटबंदी दिसते. एका बाजूला अगदी मुख्या दिंडी दरवाजाजवळ दिमाखात उभा असलेला १६व्या शतकातला लाईट हाऊस चा टॉवर लक्ष वेधून घेतो. या टॉवरवर चढण्याची परवानगी नाही.किल्ल्याच्या चारही बाजूंनी एक खंदक खणलेला आहे. पूर्वी

इथे पाणी वगैरे भरत असावेत, पण सध्या मात्र अगदी कोरडा पडलाय तो खंदक. किल्ल्याचा विस्तार उगीच समुद्राच्या आतपर्यंत गेल्यासारखा वाटतो.

एकीकडे मांडवीचे पात्र, तर दुसरीकडे उफाळणारा अरबी समुद्र. एक सुंदर कॉंबो ऑफर. किल्ल्याच्या उजव्या बाजूला पाहिले, तर समुद्राच्या पाण्याने झिज झालेला किनारा, आणि सिक्वेरीम बिच दिसतो. किल्ल्याच्या तटबंदीला समांतर  असलेली दुसरी तटबंदी ही मुद्दाम  दोन्हीच्या मधे पाणी भरुन किल्ला सुरक्षित करण्यासाठी बनवलेली आहे. किल्ल्याच्या आतल्या भागात मध्य भागी एक अंडरग्राऊंड पाण्याची टाकी आहे. जमिनीवर पण जांभा चिरे बसवलेले असल्याने कुठेही उघडी जमीन दिसत नाही आणि किल्ला एकदम स्वच्छ वाटतो.

किल्ल्याच्या तटबंदीवरून समुद्राकडे लक्ष देता यावे म्हणून तटबंदीला आतल्या अंगाने सैनिकांना चालण्यासाठी  काही ठिकाणी तिन -चार फुट रुंद तर काही ठिकाणी सहा फूटा पेक्षा जास्त अशी जागा बनवलेली आहे.  बऱ्याच ठिकाणी तोफांची पण जागा दिसून येते, पण एकही  तोफ इथे दिसत नाही. या फुटपाथवर उभे राहिले की मागे अरबी समुद्राचे विराट रुप पहायला मिळते.समुद्रावरून  येणारा सुसाट वारा उन्हाची काहीली अजिबात जाणवू देत नाही, आणि फेसाळणारा अरबी समुद्र नजरेला शांत करतो- पण दमटपणा मुळे घाम मात्र खूप येतो. पुर्ण किल्ल्याच्या तटबंदी भोवती चक्कर मारायला साधारण ३० मिनिटे पुरतात.

किल्ल्याच्य पार्श्वभूमीवर एक रेखीव गाव दिसते, ते म्हणजे ताज व्हिलेज रिसॉर्ट! लोकेशन तर खूप छान आहे, पण रुमचे दर वगैरे परवडण्या पलीकडे आहेत.  याच किल्ल्यावर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली की इथे गाईड  नाहीत , त्यामुळे पुर्वी दारूखाना कुठे होता, आणि इतर जागाबद्दलची माहीती अजिबात मिळत नाही- आणि बहूतेक जागा अंदाजानेच  समजावून घ्याव्या लागतात. पण जरी गाईड नसला तरीही किल्ला  पहायला मस्त वाटते  . पोर्तुगीज सत्तेच्या दृष्टीने एक अतिशय महत्वाचे ठिकाण म्हणजे हा किल्ला. एकदा अवश्य भेट द्या गोव्याला गेल्यावर.



खंदकाचा भाग, किल्ल्याच्या वरच्या भागातून काढलेला फोटो.

तळटीप:- या किल्ल्याच्या समोर पाण्याची बाटली, सोडा वगैरे विकत मिळतो, पण त्याचे भाव मार्केट रेटच्या तिप्पट -चौपट किंवा त्या दुकानदाराला वाटतील तेवढे असतात , आणि दुकानदार पण उद्धट आहेत. तेंव्हा आपल्या खाण्यापिण्याच्या वस्तू शक्यतो सोबत घेऊन जावे.

# आठवं आश्चर्य.. स्टेप वेल..

अहमदाबाद ला एअरफोर्स च्या ऑफिस मधली मिटिंग आटोपून पुन्हा हॉटेलवर निघालो, तर सहजच ड्रायव्हरला विचारलं की इथून अडलज किती दुर आहे, तर तो म्हणाला की बस ८-१० किमी होगा- म्हंटलं चलो, कारण अशी संधी म्हणजे दुसऱ्या मिटींगसाठी दीड तास होता, म्हंटलं या वेळाचा सदुपयोग करुन घ्यावा. या वेळेसची गुजराथ टुर खूप इव्हेंटफुल झाली. बिझिनेस विथ प्लेझर म्हणता येइल त्याला.अहमदाबादची दोन प्रेक्षणीय स्थळं पाहिलीत- जी आजपर्यंत अहमदाबादला अनेक वेळा येउन सुध्दा , गेल्या कित्येक वर्षात बघितली गेली नव्हती. एक म्हणजे इ.स. १५०१ मधे बांधलेली विहीर, आणि दुसरी म्हणजे त्याच सुमारास तयार करुन सिद्धि सैय्यद ची मस्जिद वर बसवलेली दगडाचे कोरीव काम करुन बनवलेली जाळी.

ही विहीर म्हणजे अप्रतिम वास्तुशास्त्राचा नमुना म्हणावा लागेल. आज पर्यंत अहमदाबादच्या लोकल लोकांना विचाराल, की यहा साईट सिइंगके लिये क्या है? तर उत्तर ठरलेलं असतं- बापू का आश्रम, अक्षरधाम और शॉपिंग मॉल्स . आता हे बापू का आश्रम, दांडी ब्रिज वगैरे ठीक आहे पण शॉपिंग मॉल -साईट सिइंग साठी?? ईट्स टू मच!!!बापू चा आश्रम मी अजूनही बघितलेला नाही- पुढल्या वेळेस नक्की. पण या वाव बद्दल कोणीच काही बोलत नाही. संपुर्ण पणे दुर्लक्षित झालेली आहे ही विहीर.

अडलजच्या ह्या विहिरीला गुजराथी मधे वाव असे म्हणतात.राणी रुदाबाई हिने इ.स. १५०१ साली ही पाच मजली विहीर बांधून काढली. डायरेक्ट वॉटर टेबलवरच खोदकाम केल्यामुळे विहिरीला नेहेमीच पाणी असतं. पाण्याची लेव्हल की पावसावर अवलंबून असते. जमिनी खाली पाच मजले कोरीव काम केलेली ही वाव म्हणजे अप्रतिम वास्तुशास्त्राचा एक नमुना आहे.इथे विहिरीच्या भिंतीवर जागो जागी देवतांच्या मुर्त्या आहेत. असं म्हणतात , की पूर्वीच्या काळी इथे लोकं सकाळी पाणी भरण्यासाठी यायचे, तेंव्हा या देवतांची पुजा करायचे.















या वाव मधे सुर्यप्रकाश हा पोहोचत नाही, त्यामुळे गुजराथच्या रखरखीत उन्हाळ्यातही इथलं तापमान हे बाहेरच्या तापमाना पेक्षा ७ ते ८ डिग्री ने कमी असते. नॅचरल एअर कंडीशनींग म्हणा हवं तर!! या विषयी जास्त लिहिण्यापेक्षा सरळ व्हिडीओ अपलोड करतो म्हणजे या वाव च्या अप्रतिम आर्किटेक्चरची कल्पना येईल वरुन पाहिल्यावर लक्षात येत नाही, पण खाली उतरलं की ही विहीर अष्टकोनी असल्याचे लक्षात येते.या व्हिडिओ व्यतिरिक्त काही फोटो पण काढले आहेत ते पण इथे पोस्ट करतोय.. हे पोस्ट नुसतं फोटो पोस्ट होणार असं दिसतंय.. असो..

विहीर बघून झाल्यावर परत रुमवर येतांना ती बहुचर्चित सिध्दी सैय्यदची मस्जिद वर बसवलेली जाळी दिसली. आजपर्यंत अनेक वेळा याच रस्त्याने गेलो असेन पण कधीच थांबून पाहिली नव्हती ही जाळी. आता या वेळेस मात्र आवर्जून थांबलो बघायला.अहमदाबादची आठवण म्हणून चांदी मधे बनवलेली ह्या जाळीची प्रतिकृती विकत मिळते. असं म्हणतात, की ही जाळी तयार केल्यानंतर बादशहाने, त्या कारागिराचे हात कापून टाकले होते- त्याने पुन्हा अशी जाळी बनवू नये म्हणून, असं म्हणतात!! इथे आहे बघा फोटो त्या जाळीचे. इतके कोरीव काम बारकाइने केले आहे की पाहून नवलच वाटतं.





सिध्दी सैय्यद ची जाळी मशिदीचा मागचा भाग

अहमदाबादला काय पहाण्यासारखं आहे म्हणुन मला विचारलं तर मी नक्कीच स्वाती रेस्टॉरंटचं नांव घेईन. पण त्यावर नंतर कधी तरी गुजराथची खाद्ययात्रा लिहायला घेइन तेंव्हा लिहीन. हे पोस्ट थोडं मोठं होतंय याची जाणिव आहे, पण नुकताच अंजार येथे जाउन आलो. अंजार म्हणजे जे गांव ९९ टक्के २६ जानेवारीच्या भुकंपा मधे नेस्तनाबुत झालं होतं , ते गांधीधाम जवळच गांव.

तेंव्हाच्या भुकंपामुळे अगदी प्रत्येक घर पडलं होतं . पण आता जेंव्हा तिथे गेलो होतो तेंव्हा मात्र एक नविन शहर वसवलेलं दिसलं. आणि तीच गोष्ट गांधीधाम ची. इथे आता नवीन वसवलेल्या गांधीधाम मधे चांगले १० पदरी रस्ते § आणि ते पण गावात बघुन आश्चर्य वाटते. अंजार हे प्रसिध्द आहे तिथल्या तलवारी, भाले, अडकित्ता आणि सुरी या वस्तूंसाठी. तिथल्या एका दुकानात गेलो होतो आणि एक सुंदर तलवार सिलेक्ट केली होती घेण्यासाठी. दुकानदार म्हणाला, फ्लाईटमे बॅगेजके साथ भी अलौड नही है. अगर ट्रेन से जानेवाले हो , तो ही खरीदो..त्या दुकानात एअर गन्स पण मिळतात- तिनशे फुट ते ८०० फुट रेंज पर्यंत. मला फ्रेडरिक फोर्सिथचं पुस्तक डे ऑफ द जॅकल आठवलं. दुकानदार म्हणाला, की या गन्सचं बॅरल बदलुन यांना रेग्युलर .३३ मधे बदलता येउ शकतं § आणि अतिशय सोपं काम आहे हे कन्व्हर्शन. हे काम यु पी मधे केलं जातं असं तो म्हणाला..

इथे जेंव्हा सगळं काही गावच नेस्तनाबुत झालं होतं, तेंव्हा इथे टेंट मधे रहावं लागायचं.त्याच सुमारास काही एन जीओ नी लोकांना रहायला म्हणून कंटेनर्स पण दिले होते , त्याच कंटेनर्स मधे आता दुकानं सुरु केलेली आहेत. जेंव्हा भुकंप झाला

होता , तेंव्हा पण एकदा येणं झालं होतं इथे तेव्हाची आठवण झाली.. इथे काही फोटो पोस्ट करतोय.



# द्वारका § ओखा पोर्ट



आता मी द्वारकेहुन निघालो आहे . टॅक्सी मधे बसून हे पोस्ट लिहितोय. ओख्याचं काम संपवून आता जामनगर ला निघालो आहे. ओखा म्हणजे एक दोन ते अडीच किलोमिटरचा अरबी समुद्रात घुसलेला एक पट्टा. तिन्ही  बाजूनी समुद्र .हवा पाणी एकदम मस्त!

ह्याचं महत्त्व  केवळ हा भाग  गुजरातच्या एक्स्ट्रिम साईडला  पाकिस्तान जवळ आहे म्हणून! म्हणतात इथून पाकिस्तानला जायला३-४ तास खूप झालेत. खरं तर या ट्रिप मधे ओखा आणी वाडीनार ला जायचा प्लॅन नव्हता. पण रिलायन्सचे काम लवकर आटोपलं, आणि वाडिनारला कर्टसी आणि ओखाला काम सुरु आहे ,  म्हणून म्हंटलं की ओख्याला आणि वाडिनारला पण व्हिजिट देऊन येऊ.
सकाळीच  निघालो आणि आधी वाडिनारला पोहोचलो.हार्डली ६० किमी आहे जामनगर पासून. वाडिनारला पूर्वी काहीच नव्हतं पण इथे  आय ओ सी एल चा एक मोठा डेपो आणि जेटी आली आणि जेटीला संरक्षण हवं म्हणून आय ओ सी एल ने कोस्ट गार्डची  सर्व्हीस घेतली आहे. गुजरातचा हा भाग खरं म्हणजे खूपच व्होलाटाइल असतो. कुठेही खुट्ट झालं की त्याचे पडसाद म्हणजे इथली सिक्युरिटी एकदम कडक होते.

आधी वाडिनारला जाउन काही महत्वाच्या लोकांची भेट घेतली . समजलं की जहाज दुसऱ्या पोर्टला गेलेलं आहे . हा भाग अगदी जंगलात, त्या मुळे को्णी बाहेरचा सुसंस्कृत जगातला प्राणी आला की इथल्या लोकांना बरं वाटतं. त्यामुळे कमांडंट शी जनरल गप्पा मारण्यातच ११ वाजुन गेले. शेवटी बाय बाय करुन उठलो आणि ओख्याला निघालो.

ओखा म्हणजे द्वारके पासुन पुढे  ३० किमी. जातांना डायव्हरला म्हंटलं की दर्शन घेउन मग जाऊ. मंदिरात पोहोचलो तर कळलं की मंदिर १२.३० ते ५ बंद असतं.

म्हणून सरळ ओखा पोर्टला निघालो. आज पर्यंत इतके समुद्र पाहिले पण ओख्या सारखा सुंदर समुद्र आजपर्यंत कुठेच पाहिलेला नाही. आधी डेप्यु. कमांडंट च्या ऑफिस मधे जाउन त्याची भेट घेतली , आणि सरळ जहाजावर निघालो. सोबत आमचा सर्विस इंजिनिअर पण होताच.





सध्या ओख्याला खूप हवा सुरु असते आणि नेमकी सकाळची वेळ भरतीची होती. कन्सिस्टंटली रोइंग पिचिंग सुरु होतं. त्यामुळे सारखी हालत असल्यामुळे जहाजावर शिडी लावता येत नव्हती. त्या ऐवजी मधे एक फ्लोट ठेवलेला होता.त्या फ्लोट चा डायमिटर १० फुट असेल .म्हणजेच डेक वर जायला १५ फुट अंतर कापावे लागणार.. आता फ्लोटवरुन जायचं माझं वय राहिलेलं नाही.फ्लोट सिलेंड्रिकल असतो, त्यामुळे त्यावर बॅलन्स करुन उभं रहातांना थोडी ्भीतीच वाटत होती.( खरं बोलतोय) लॅपटॉप ची बॅग सर्व्हीस इंजिनिअरच्या हातात देऊन फ्लोटवर स्वतःला बॅलन्स करित कसा तरी जहाजावर पोहोचलो.१००० हॉर्स पॉवरची तिन जेट्स आहेत ह्या जहाजावर. मस्त स्पिड घेतं. अर्थात कोस्ट गार्डला जास्त स्पिड ही हवीच म्हणजेच तर घुसखोरांना पकडता येइल नां??

खाली इंजिन रुम मधे गेलो तेंव्हा पिचिंग इतकं वाढलं होतं की मला काहिच सुचेनासं झालं.. तो सर्व्हिस इंजिनिअर सांगत होता, कि सर , हे स्टारबोर्ड साइडचं इंजिन हंटींग करतंय, आणि पोर्ट साइडच्या इंजिनाचा रुटीन करायचंय.. म्हंटलं ठिक आहे कर तुला काय हवं ते.. आणि सरळ वर डेक वर गेलो. थंड हवा लागली तेंव्हा जरा बरं वाटलं.

वरंच बसुन रहिलो, आणि व्हिल रुम मधे बसुन कोल्डड्रिंक चा कॅन ओपन केला. फेल्ड पार्टस वर व्हिल रुम मधे आण म्हंटलं आणि तिथेच मग चेक केले.

खरं तर हल्ली स्वतः काम करणं बंदच झालंय. पण पिआरओ चं काम करता करताच थकून जातो. जहाजावरचं काम आवरुन बाहेर जेटिवर उभा राहिलो.

सहज गप्पा मारत होतो कॅप्टनशी. तर कॅप्टनने समोर हात दाखवला.. म्हणे ती मिरा बघितली कां? म्हंटलं .. काय़ विशेष? तर म्हणे ६० नॉटच्या स्पिडनी पळते. आयला.. मी तर तोंडात बोटं घालायचीच बाकी ठेवली होती.. २५० ऒबिएम.. मग माझ्यातला इंजिनिअर जागा झाला , लगेच उडी मारुन खाली उतरलो अन सरळ बोटीजवळ गेलो..





मोस्ट सेक्सी स्टफ आय हॅव एव्हर सिन.. कसली सुंदर होती ती.. एका साइडला तटरक्षक लिहिलेलं.. मागे दोन २५०ची दोन व्हिसिक्स .. वाह!! मस्त वाटलं एकदम. म्हंटलं , कॅप्टन शुड वी गो फॉर अ स्पिन?? तर म्हणे नॉट टुडे.. शी इज अंडर मेंटेनन्स.. इफ़ यु स्टे टुडे वि मे गो टुमारो इव्हिनिंग॰ म्हंटलं , नो वे कॅप्टन, गॉट टू गो टु जामनगर , सिन्स माय फ्लाइट रिपोर्टींग टाइम इज ११ ए एम.. मे बी नेक्स्ट टाइम..

कॅप्टनला पण तसं काहीच काम नव्हतं.. शिप अंडर मेंटेनन्स असली की कॅप्टन तसा रिकामटेकडाच असतो. सहज त्याला म्हंटलं, की त्या फिशिंग ट्रॉलर्स अशा का पडल्या आहेत? तर म्हणे इथून पाकिस्तान बॉर्डर फक्त ६० नॉट्स वर आहे ३० कीमी पर्यंत आपली म्हणजे भारताची हद्द आहे. पाकिस्तानी बोटी आपल्या हद्दीत आल्या तर त्यांना

पकडून इकडे आणले जाते. पाण्यामधे आपली हद्द कुठपर्यंत आहे हे त्या लोकांनाही ओळखणं कठिण होते. अगदी हाच प्रॉब्लेम आपल्या बाबतीतही होतो. आपले कोळी पण त्यांच्या हद्दी मधे गेले की पकडल्या जातात. पाकिस्तानी मच्छीमार भारताच्या हद्दी मधे आले की मग त्यांना अटक करुन इथे आणले जाते. २६/११ नंतर जरा जास्तच कडक झालंय .बऱ्याच बोटी सडल्या होत्या. काही फायबरच्या बोटी पण इथे पडल्या होत्या. त्यांची अवस्था पाहून वाईट वाटलं. सहज एका बोटीवर चढलो आणि माझा इंटरेस्ट म्हणजे कुठलं इंजिन आहे ते बघायला इंजिनरुमकडे वळलो. सगळ्या बोटींची जॅपनिज इंजिन्स होती. जाउ दे तुम्हाला उगाचच बोअर करित नाही.खाली कंाही पाकिस्तानी बोटींचे फोटो दिलेले आहेत ..



तस सगळं झाल्यावर म्हणालो, कॅप्टन निघतो मी आणि सरळ टॅक्सिमधे बसलो . सध्या इथे हवा मोठी मस्त आहे,. उन्हं अजिबात नाही, छान वारं सुटलेलं असतं. ड्रायव्हरला म्हंटलं की एसी बंद करो आणि खिडकी उघडून मस्त वारं खात प्रवास सुरु केला. डोक्यावर शिल्लक असलेले केस मस्त भुरु भुरु ऊडत होते. वाटलं.. आराधनामधल्या राजेशखन्ना सारखे केस असते तर मस्त मजा आली असती ! 🙂

आता ५ वाजून गेले होते. म्हणून द्वारकेच्या मंदिरात गेलो. दर्शन घेतलं .. ती सुंदर काळी मुर्ती खूपच मनमोहक दिसत होती. शेजारिच शंकराचार्यांचं पण मंदिर आहे तिथे पण जाउन दर्शन घेतलं आणि थेट४. जामनगरला पोहोचलो. बेट द्वारका आणि नागनाथाचं मंदिर राहिलं, वेळेअभावी. असो, पुढल्या वेळेस बघू या..तेवढ्यात सौ. चा फोन आला.. म्हणे जेवण झालं ? म्हंटलं नाही४ पण बरं वाटलं.. चला कोणी तरी तर आहे विचारणार४४.! 🙂

# फोर्ट ग्वालियर



ब्लॉग लिहितानाच एक पक्कं केलेलं होतं की काही झालं तरीही प्रवासवर्णन लिहायचं नाही. मला स्वतःला प्रवासवर्णन वाचण्यात फारशी मजा येत नाही. कारण काय? तर प्रवास वर्णनात लोकं अगदी आज सकाळी किती वाजता निघालो,काय खाल्लं, कुठे जेवलो, किती जेवलो, आणि किती वाजता परत आलो, असे निरर्थक डिटेल्स देतात, की जे वाचायला कंटाळवाणे होतात.

हे प्रवास वर्णन नाही, फक्त मला आवडलेल्या एका किल्ल्याची थोडक्यात माहिती आहे. काही दिवसापूर्वी मी ग्वालियरला गेलो होतो. कित्तेक वर्ष ग्वालियरला जाणं होतंय पण तिथला किल्ला पहाण्याचा योग याच वेळेस आला. थोडा रिकामा वेळ सत्कारणी लावायचा म्हणून किल्ला पहायला गेलो होतो.
ह्या किल्ल्याचे बांधकाम इ.स. १४८० ते ११५०८ मधे राजा मानसिंह तोमर ह्या हिंदु राजाने केले होते. सगळ्यात आश्चर्याची गोष्ट म्हणजे आज इव्हन ५०० वर्षांच्या नंतर पण ह्या किल्ल्याची परिस्थिती उत्कृष्ट आहे.

कुठेही भिंती खचल्या नाहीत., किंवा इतर काही डॅमेजेस झाले नाहीत.आजही हा किल्ला अतिशय उत्कृष्ट अवस्थेत आहे. हेच जर आपण शिवाजी महाराजांचे किल्ले पाहिले तर एकही दालन व्यवस्थित अवस्थेत सापडत नाही.

पूर्वीच्या काळी म्हणजे ५०० वर्षांपूर्वी रंगवण्यासाठी वापरात आलेले व्हेजिटेबल कलर्स आणि दगडांवर केलेले निळे मीना काम आजही बऱ्याच ठिकाणी सुस्थितीत आहे.

ह्या किल्ल्याची एक खास विशेषता म्हणजे ह्या किल्ल्याचे चार मजली बांधकाम आहे. त्यापैकी दोन मजले जमिनीखाली आहेत. ह्या जमिनी खालच्या मजल्यावर राणी वास होता असे म्हणतात. सगळ्यात खालच्या मजल्यावर पाळणाघर, आणि राण्यांना जलक्रीडा करण्यासाठी म्हणून केसर कुंड आणि एक फाशी घर पण आहे. ह्या किल्ल्याची उंची ३०० फुट आहे. तळघरामधे ्नैसर्गीक प्रकाशाची व्यवस्था आरसे

वापरुन केलेली आहे. कुठल्याही प्रकारचे आर्टीफिशिअल लाइटींग न करता सगळीकडे व्यवस्थित प्रकाश असतो.

भर उन्हाळ्यात पण इथे या तळ घरामधे अगदी थंड आणि शांत वाटतं.तळघरातून वर बोलता यावं म्हणून दोन पोकळ पाइप लाइन रन करण्यात आलेली आहेत भिंतीतून! ह्या दोन पाइप पैकी एक पाइप बोलण्यासाठी आणि दुसरा ऐकण्यासाठी वापरात यायचा.

राजाच्या बेडरुमच्या भोवती चारही बाजुने नर्तकी पायात घुंगरं बांधून राजाला उठवायला म्हणून सकाळी नाच करायच्या, असं तो गाइड सांगत होता. अर्थात गाइडच कितपत खरं आणि कितपत खोटं हे काही लक्षात येत नाही. तरीही अशा ठिकाणी गाइड असला की जास्त मजा येते.

बाहेरुन सजवण्यासाठी मोर, सिंह, हत्ती बदक इत्यादींच्या आकृत्या कोरण्यात आलेल्या आहे. त्या काळच्या जाळ्या सुद्धा अजुन व्यवस्थित आहे.सद्यस्थितीचा पहाता, हा किल्ला कमीत कमी अजुन ५०० वर्ष असाच उभा राहील असे वाटते.

१६व्या शतकामधे हा किल्ला मुघलांच्या ताब्यात होता. पण त्यांनी हा किल्ला डॅमेज न करता जेल म्हणून उपयोगात आणला.किल्ल्याच्याच परिसरात दोन मंदिरं पण आहेत. त्या पैकी एक सास बहु का मंदिर आणि दुसरं तेली का मंदिर ही दोन्ही मंदिरं अगदी सुस्थितीत आहेत आणि मेंटेनन्स पण सुंदर ठेवलं आहे. १६ व्या शतकात मुघलांच्या ताब्यात गेल्या मुळे सगळ्या मंदिरातील मुर्त्या मात्र  चोरीला गेलेल्या आहेत.

शिवाजी महाराजांच्या किल्ल्यापैकी एकही किल्ला अजुन बऱ्या अवस्थेत नाही ह्याचं वाइट वाटतं..

# उत्खननाच्या साईट्वर - १

सरायपाली. साधारण १९० किमी असेल रायपूर पासून. सकाळी लवकर निघालो, रस्ता पण बरा, त्या मुळे सगळी कामं लवकरच आटोपली आणि आम्ही परत निघालो रायपूरला जायला. रस्त्यावर दोन्ही बाजूला भाताची पेरणी सुरु झालेली दिसत होती. नुकताच पाऊस होऊन गेल्यामुळे वातावरण पण छान होतं.रस्त्यावर एक पाटी दिसली.. शिरपूर- १७ किमी. बरोबर असलेल्या मित्राने सांगितले की इथे खूप सुंदर प्राचीन वस्तू सापडल्या आहेत, बघायच्या का?
उत्खनन झालेल्या वस्तू तर आपण नेहेमीच पहातो, पण उत्खनन सुरु असलेली साईट बघायची? अशी संधी फारच कमी वेळा येते. म्हणून उत्साहातच तयार झालो बघायला.




शर्माजी नविनच उत्खनन केलेल चित्र समजाऊन सांगतांना.

अर्थात!! नेकी और पुछ पुछ? म्हणून आम्ही त्या शिरपूरला पोहोचलो. शिरपूरला गेल्यावर सगळ्यात प्रसिद्ध असलेल्या लक्ष्मण मंदीराकडे मोर्चा वळवला. मंदीराकडे जाणारा एक वळण मार्ग दाखवला होता. तिकडे जाउन मंदीराच्या गेट जवळ पोहोचलो, तर त्या चार एकराच्या कंपाउंड्ला कुलूप! सहज दूर लक्ष गेलं, तर एक ठिकाणी एक म्हातारा माणूस आणि काही लोकल लोकं काहीतरी करतांना दिसले.




तुटलेले पाट्‌र्स जोडतांना..

चिखल तुडवत तिकडे जाउन पोहोचलो. त्या जागे मधे तो माणूस म्हणजे ऑड मॅन आऊट असा दिसत होता. वय असेल ७० च्या वर.आम्ही जाउन त्यांना नमस्कार केला आणि स्वतःची ओळख करून दिली. त्यांना खूप आनंद झालेला चेहे‍ऱ्यावर स्पष्ट दिसत होता. ते गृहस्थ म्हणेज छत्तीसगढ सरकारने खास अपॉईंट केलेले श्री एके शर्मा. हे एके शर्माजी पुरातत्त्व विभागातले एक एक्स्पर्ट म्हणून ओळखले जातात. रिटायर्ड झाल्यावर पण अंदाजे गेली कित्तेक वर्ष ते एक्स्कॅव्हेशन चे काम करताहेत.




बाबरी मस्जिदच्या केस मधे यांचे मत घेण्यासाठी यांना पण सरकारने बोलावले होते. तिथे बाबरी मस्जिद कशी नव्हती हे त्यांनी अतिशय उत्तमरीत्या समजाऊन सांगितले

§ आता त्याबद्दल लिहित नाही नाहीतर तेच एक पोस्ट व्हायचं. म्हणाले आता परवा पुन्हा लखनऊ ला केस आहे , तेंव्हा जायचंय साक्ष द्यायला.

या वयात पण इतका उत्साह पाहून बाकी एकदम आश्चर्यचकित झालो. जवळपास गेली १३ वर्ष ते ह्या साईटचे उत्खननाचे काम पहात आहेत.  अरूण कुमार शर्मा हे नांव एक अतिशय विख्यात नाव आहे  भारतातलं.  त्या माणसांना शर्माजी सुचना देत होते. एका खांबाचे तुकडे सापडलेले दिसत होते, आणि जिग सॉ पझल प्रमाणे ते तुकडे जोडण्याचे काम सुरु होते. जमिनीवर एका बाजूला भग्नावस्थेत ले पांढऱ्या दगडाचे तुकडे दिसले. ते म्हणजे शिवलिंगाचे तुकडे आहेत , आणि ते पण या  खांबा प्रमाणेच जोडले जातील असे त्यांनी सांगितले.




उत्खननात बाहेर निघालेले मंदीर..

इथे एक लहानसा टीळा होता. त्या टीळ्याखाली दडलेले हे मंदीर . मंदीराचा प्लान पुर्णपणे व्यवस्थित आहे. इ.स. ६५० च्या काळात त्या मंदीरात अंथरलेली फरशी अजूनही उत्कृष्ट अवस्थेत दिसत होती.फ़रशीची जाडी पण चांगली तिन इंच असेल. गर्भ गृहाचे दार त्यांनी दाखवले बरेचसे तुकडे जोडून पुर्ण केलेल ते दार अप्रतीम कलाकृतीचा नमूना होते. मंदीराचे दार इथे असावे, इथून तुम्ही आत आलात, की इथे नंदी, मग पुढे गर्भगृह.. इथेच म्हणजे याच साईटवर शर्माजींना सापडलेली एक मुर्ती आता संग्रहालयात साफ सफाई करता नेऊन ठेवलेली आहे. तिकडे जाऊन पहा म्हणाले ते.या मंदीराला लागूनच दूसरे शिवाचे मंदीर दिसत होते. आता शिवाचे मंदीर दोन का? आणि ते पण एकाच जागी- एकाला एक लागून? तर त्यावर ते  म्हणाले की हे पुर्वीच्या काळात  जातींची    मंदीरं असावीत.




पण मला पण आश्चर्य वाटलंच. या माणसाचा उत्साह मात्र वाखाणण्यासारखा आहे. अहो इतक्या उन्हातान्हात दिवसभर उभा असतो हा गृहस्थ खोदकामाच्या ठिकाणी. ते गमतीने म्हणाले की जर मी नसलो तर एखादी सुंदर कलाकृती पण ही मट्ठ मंड्ळी कुदळीने खोदून काढतील.




मंदीराची फरशी नुकतीच बाहेर निघालेली.

एखादी मुर्ती आहे असा संशय जरी आला , तरीही कुदळी वगैरे वापरणे बंद केले जाते आणि लहानशा चमच्या एवढ्या अवजारानी , ब्रशनी माती दूर केली जाते .बाहेर काढतांना मुर्तीचे काही नुकसान होऊ नये म्हणून खूप काळजी पूर्वक काम करावे लागते. इथे काम करणारे पण लोकल छत्तीसगढी लोकं . अर्थात इतकी वर्ष आमच्या

बरोबर काम करून ते लोकं आता काळजी पूर्वक काम करायला शिकले असल्याने फारसा त्रास होत नाही. °उनके दिलमे भी इन कलाकृतीयोंके बारेमे दर्द  और प्यार पैदा कर दिया है हमने” असे म्हणणारे शर्माजी¤. हॅट्स ऑफ टू हिम




हे पोस्ट तर खूप मोठं होतंय. अजून खूप महत्वाची माहिती लिहायची आहे- बरेच फोटो पण आहेत पण .. पुढल्या भागात ..पुर्ण बाहेर निघालेले मंदीर § जगातले एकमेव  विटांचे मंदीर आणि  ते देखील ६व्या शतकातले.

# उत्खननाच्या साईट्वर - २




अरूण कुमार शर्मा.

जाण्यापूर्वी बराच वेळ गप्पा मारल्या शर्माजींशी ,त्यांनी पण बऱ्याच टीप्स दिल्या की जुनी स्थळं कशी काय पहायची ते. प्रत्येक दगड काहीना काही तरी बोलत असतो, प्रत्येकाची आपली एक कहाणी असते , ती तुम्हाला वाचता आली पाहिजे तरच तुम्ही प्रत्येक वस्तू एंजॉय करू शकता. सध्या आम्ही जिथे गप्पा मारत बसलो होतो तिथे एक मंदीर सापडले होते. मंदीर म्हणण्यापेक्षा मंदीराचे अवशेष. जुन्या मंदीरातल्या मुर्त्या , कोरीव खांब वगैरे लोकांनी चोरून विकल्या आहेत तर काही लोकांनी चक्क घराचा पायवा भरताना हे दगड, किंवा भग्न झालेल्या मुर्त्यांचे तुकडे वगैरे पण वापरले आहेत. कित्तेक अनमोल वस्तू अशा तर्हेने इतिहास जमा झालेल्या आहेत. जुन्या वस्तूंची किंमत लोकल लोकांना न समजल्याने असे होते.

